# देवाच्या नावाने

## राजकीय ख्रिस्तीधर्माचा अपयश




दानूटसन ब्राउन

# देवाच्या नावाने

## राजकीय ख्रिश्चन धर्माचे अपयश

डानुतासन ब्राउन

Printed in Australia by
Maranatha Media
maranathamedia.com

July 22, 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई वोईलेट डिसोझा ह्यांनी मदत केली आहे.

# सामग्री


मानवी राजकारणातील ख्रिस्ती विरुद्ध  येशूने परिभाषित केलेले ख्रिस्ती.................3

अमेरिकेतील मंडळी आणि राज्य यांच्यातील घनिष्ठ संबंध.....................................6

राजकारणात धर्म ही काही नवीन गोष्ट नाही........................................................11

मिशनरी आणि साम्राज्य.....................................................................................17

कॉन्स्टँटाईन आणि ट्रम्प..................................................................................... 21

नाझी जर्मनीतील मंडळी आणि राज्य..................................................................26

देव हिंसक आहे की माणूस?...............................................................................36

# मानवी राजकारणातील ख्रिस्ती विरुद्ध येशूने परिभाषित केलेले ख्रिस्ती

डोनाल्ड ट्रम्प यांचा आवडते बायबल वचन “डोळ्याच्या बदल्यात डोळा” हे आहे, असं त्यांनी गुरुवारी सांगितलं. डब्ल्यूएचएएम ११८० एएम रेडिओचे होस्ट बॉब लोंसबेरी यांनी या रिपब्लिकन आघाडीच्या उमेदवाराला विचारलं की, बायबलमधलं असं कोणतं वचन किंवा गोष्ट आहे का ज्याचा त्यांच्या विचारसरणीवर किंवा व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडला आहे?

“बरं, मला वाटतं की अनेक आहेत. म्हणजे, तुम्हाला माहीत आहेच, जेव्हा आपण बायबलकडे पाहतो, तेव्हा मला वाटतं की अनेक आहेत. खूपच,” असं त्यांनी उत्तर दिलं. “आणि काही लोक पाहा, ‘डोळ्याच्या बदल्यात डोळा’, तुम्ही जवळजवळ असं म्हणू शकता. हे काही विशेष गोड किंवा सौम्य वचन नाही. पण तुम्ही जर आपल्या देशात काय घडतंय हे पाहिलंत, म्हणजे जेव्हा तुम्ही पाहता की लोक आपला गैरफायदा घेत आहेत, आणि आपल्यावर कसा उपहास करतात आणि आपल्यावर हसतात तेव्हा…”

https://www.politico.com/blogs/2016-gop-primary-live-updates-and-results/2016/04/trump-favorite-bible-verse-221954

‘डोळ्याबद्दल डोळा व दाताबद्दल दात’ असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे; आणि जो कोणी तुला वेठीस धरून एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा. जो तुझ्याजवळ काही मागतो त्याला दे आणि जो तुझ्यापासून उसने घेऊ पाहतो त्याला पाठमोरा होऊ नकोस. ‘आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर,’ असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाइटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगववतो आणि नीतिमानांवर व अनीतिमानांवर पाऊस पाडतो. मत्तय ५:३८:४५

हा एक असा प्रश्न आहे जो अमेरिकेतील बऱ्याच राजकीय चर्चेच्या मुळाशी आहे आणि ज्यामुळे अमेरिकाकडे पाहणाऱ्या परराष्ट्रीय लोकांना गोंधळात टाकतो: इतके बरेच अमेरिकी ख्रिश्चन डोनाल्ड ट्रम्प यांना का इतक्या निष्ठेने पाठिंबा देतात, जे येशूसारखे वर्तन अजिबात करत नाहीत? तसेच, ख्रिश्चन मूल्यांनी प्रभावित अमेरिका देशाचे परदेशी लष्करी धोरण का अतिशय आक्रमक आहे? इतक्या शक्तिशाली "बळकट नेत्याची" गरज का भासते; अमेरिका जगात एक नंबर देश असावा अशी इतकी तीव्र आकांक्षा का आहे?

ख्रिस्ती धर्मात एक मोठी संज्ञानात्मक विसंगती आहे जी जागतिकीकरणामुळे आणखी तीव्र झाली आहे. हा अंतर्विरोध आहे येशूने दिलेल्या "तुमच्या शत्रूंवर प्रेम करा" या शांततेच्या शिकवणीचा, आणि जुन्या करारातल्या देवाच्या रागीट, बदला घेणाऱ्या रूपाचा. वैयक्तिक पातळीवर ख्रिस्ती लोक सहसा मृदु व सौम्य असतात, आणि येशूच्या मार्गाचा अवलंब करतात. पण राष्ट्रीय किंवा सामूहिक पातळीवर, विशेषत: विदेशी, इतरधर्मीय किंवा "काफिर" लोकांशी विषयात, जुन्या करारातील देवाचा "बस झाले, आता पुरेसं झाले" दृष्टिकोन प्रकट होतो. असं वाटतं की येशूच्या शिकवण्या आमच्या दैनंदिन, स्थानिक जीवनासाठी आहेत, पण ज्यांना देव माहित नाही किंवा जे आमच्या प्रमाणे देवाची उपासना करत नाहीत त्यांच्यासाठी देवाच्या रागीट इच्छेला जागा आहे. जुन्या करारातील देव शत्रूंना ठार मारतो, संपूर्णपणे नष्ट करतो... नाही काय? हेच कदाचित रिचर्ड डॉकिन्स जो कदाचित जगातील सर्वात प्रसिद्ध नास्तिक आहे यांच्या मते:

"जुन्या करारातील देव हा सर्वात अप्रिय पात्र आहे: तो मत्सराने भरलेला आहे आणि त्याचा अभिमानही तो घेतो; एक किरकोळ, अन्यायकारक, क्षमाशून्य नियंत्रणतंत्र वापरणारा; सूड घेणारा, रक्तपिपासू, वंशसमूल करणारा; स्त्रीद्वेषी, समलैंगिकद्वेषी, जातीभेद करणारा, बालहत्यारा, वंशनाश करणारा, महामारी निर्माण करणारा, स्वमग्न, क्रूर कृत्य करणारा, ऐच्छिकपणे अन्याय करणारा."

कृपया थोडं थांबा जर तुम्ही ख्रिस्ती नसल्यामुळे सहमतीने मान डोलवत असाल, किंवा ख्रिस्ती असल्यामुळे चिडून हे पुस्तिकच टाकून द्यायची तयारी करत असाल, तर संयम बाळगा. आम्हाला असं वाटतं की जुन्या करारात काय घडतंय हे समजून घेण्यासाठी एक वेगळा मार्ग आहे आणि येशू आपल्याला ते समजून घेण्यासाठी योग्य असा दृष्टिकोन देतो. पण त्यासाठी अभ्यास, नम्रता, संयम आणि सहवेदना आवश्यक आहे. या गोष्टींचा गांभीर्याने विचार करणं हे एक आशीर्वादच आहे, जरी केवळ यासाठीच असलं तरी की आपल्या मनात

असलेल्या त्या सर्वशक्तिमान अस्तित्वाच्या प्रतिमेतील भीती, एक असं अस्तित्व जे कोणत्याही क्षणी आपल्याला ठार करू शकेल, या मानसिक धक्क्याशी सामना करता यावा. पण हा तोच देव आहे का, ज्याच्याकडे येशू वर जाणार असल्याचे म्हणाला होता? रिचर्ड डॉकिन्स ज्या देवाचे वर्णन करतो, तो माणसांनी स्वतःच्या प्रतिमेत घडवलेला देव आहे तो खरा देव नाही. माझी ही आशा आहे की या अभ्यासाच्या माध्यमातून आपण आपला खरा स्वभाव दोषपूर्ण, विसरभोळा, भयभीत आणि देवाचा खरा स्वभाव दयाळू, कृपाशील, सर्वांवर प्रेम करणारा ओळखू लागू. आणि त्यामुळे आपल्याला मानवी स्थितीचे, आपण कुठून आलो आणि कुठे चाललो आहोत याचे अधिक चांगले आकलन मिळेल, आणि अखेरीस आपण आपल्या निर्माणकर्त्याशी समेट करू शकू.

मी अर्धा थाई आणि अर्धा अमेरिकन असून थायलंडमध्ये वाढलो. त्यामुळे जेव्हा मी पाहिले की अमेरिका इतर प्रत्येक देशावर आपली सत्ता लादण्याचा प्रयत्न करत आहे, तेव्हा मला प्रचंड राग आला आणि लाजही वाटली. मी, आणि माझ्यासारखे बरेच गैर-अमेरिकन लोक, अमेरिकेच्या आत्मघोषित धार्मिक आणि नैतिक भाषणामधील खरे हेतू पाहू शकत होतो ते म्हणजे पैसा, सत्ता आणि संसाधनं मिळवण्याचा स्वार्थ. मला अमेरिकेच्या परकीय देशांतील हस्तक्षेपाचा तीव्र विरोध होता, आणि जेव्हा राजकारणी लोक युद्धासाठी उतावळेपणाने घोषणा करत होते, भीती निर्माण करणारी भाषा वापरत होते, तेव्हा मला त्यांचा खोडसाळपणा पाहून धक्का बसायचा. मला जेव्हा हे समजले की अमेरिका प्रचंड कर्जात आहे आणि देशांतर्गत गरीबपणा, कौटुंबिक हिंसाचार, अमलीपदार्थांचे व्यसन, निधीअभावी चालणाऱ्या शाळा, आणि झपाट्याने वाढत चाललेली तुरुंगातील लोकसंख्या या सारख्या गंभीर समस्या आहेत, तरीही देशाचा मोठा आर्थिक निधी लष्करावर खर्च केला जातो, आणि अमेरिका जगभरात १५० देशांमध्ये सक्रिय सैनिक तैनात ठेवते तेव्हा मी थक्क झालो. इतर राष्ट्रांवर वर्चस्व गाजवण्याला एवढं प्राधान्य का दिले जाते?
(http://edition.cnn.com/interactive/2012/04/us/table.military.troops/)

मी एका धर्मनिरपेक्ष कुटुंबात वाढलो वडील अग्नोस्टिक (देव आहे की नाही, हे नक्की सांगू न शकणारे) आणि आई बौद्ध. त्यामुळे अमेरिकेतील ख्रिस्ती उजव्या विचारसरणीच्या लोकांनी युद्धाला दिलेला पाठिंबा आणि रिपब्लिकन पक्षाशी असलेली जवळीक पाहून मला प्रचंड घृणा वाटायची. (त्या वेळी माझी समज होती की रिपब्लिकन पक्ष म्हणजे युद्धाचाच पक्ष. आता मला माहिती

आहे की दोन्ही पक्ष युद्धाचेच पक्ष आहेत, फक्त रिपब्लिकन थोडे अधिक आक्रमक आणि थेट आहेत.) मी जे काही पाहिले त्यावरून ख्रिस्ती धर्म हा मला हिंसा आणि युद्धाचा धर्म वाटायचा. अनेक थाई बौद्धांची हिच समज आहे, तसंच अनेक धर्मनिरपेक्ष युरोपीय, जपानी, भारतीय लोकांचाही. पण यापासून माझं मत खरोखर बदलायला लागलं ते अनेक वर्षांनी जेव्हा मी वेल्समध्ये उच्च पदवी करत असताना एका नायजेरियन स्त्रीला भेटलो.

त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांनी इराककडे सामूहिक संहाराची शस्त्रास्त्रं असल्याचे खोटं सांगितल्यामुळे माझ्या रागाला आणखीच खतपाणी मिळाले. बुश स्वतःला एक “नव्याने जन्म घेतलेला ख्रिस्ती” म्हणवून घेत होता, त्यामुळे मला ख्रिस्ती धर्म आणि ख्रिस्ती देव दोघेही हिंसा, दडपशाही, आणि सर्वांवर नियंत्रण ठेवण्याच्या विकृत गरजेशी जोडलेले वाटत होते. देव म्हणजे सत्तेचा धोंडशाही करणारा देव वाटायचा जो आपल्या विरोधात विचार करणाऱ्यांना जाळून टाकतो आणि त्यांना अनंत काळासाठी नरकात फेकतो. तिथे त्यांना कोणतीही जागा नव्हती. तिथे इतर विचारसरणींच्या लोकांबद्दल समजूतदारपणा किंवा सहवेदना नव्हती. माझ्या अमेरिकन वडिलांनी १९६०च्या दशकाच्या उत्तरार्धात ख्रिस्ती धर्म का सोडला होता, हे मला समजून आले. आणि आज कितीही ख्रिस्ती मिशनरी परदेशात गेले, प्रचार केला, तरी लोकांच्या मनात देवाची जी प्रतिमा तयार झाली आहे ती बदलणं फार कठीण आहे. येशू आपल्या पित्याचा स्वभाव दाखवत होता हे लोक विसरून गेले. जर आपण असा विचार केला की एखादा सैतान अस्तित्वात आहे एक असा सैतान ज्याला देवाच्या स्वभावावर कलंक लावण्यात सर्वांत मोठं यश मिळवायचे होते तर तुम्हाला असं वाटत नाही का की त्याला ते पूर्णतः जमून गेले आहे? पण येशूने म्हटलं होतं की, “पिता अगदी माझ्यासारखाच आहे…”

येशूने त्याला म्हटले : “फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर ‘आम्हांला पिता दाखवा’ असे तू कसे म्हणतोस? योहान १४:९

## अमेरिकेतील मंडळी आणि राज्य यांच्यातील घनिष्ठ संबंध

ख्रिस्ती धर्माच्या स्वभावाविषयी माझ्या मनात असलेले संशय बळावले, जेव्हा मी खालीलप्रमाणे काही कथा ऐकल्या:

माजी संरक्षणमंत्री डोनाल्ड रम्सफेल्ड यांनी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांना सादर केल्या जाणाऱ्या "वर्ल्डवाइड इंटेलिजन्स अपडेट" या अहवालाच्या मुखपृष्ठावर बायबलमधील वचनं छापण्यास सुरुवात केली होती...

प्रत्येक मुखपृष्ठावर प्रेरणादायक रंगीत छायाचित्रं असत जसे की सैनिक प्रार्थना करत आहेत, एक तरुण युद्धासाठी तयार होतो आहे, सद्दाम हुसेनचा पुतळा कोसळतो आहे. त्यासोबत काही बायबल वचनंही असत काही सैनिकांना बळ देण्यासाठी, तर काही युद्धाच्या उद्दिष्टालाच "दैवी" ठरवणारी.

एका अमेरिकन रणगाड्याच्या फोटोच्या शेजारी लिहिलं होते: वेशी उघडा म्हणजे सत्याचे पालन करणारे नीतिमान राष्ट्र आत येईल. यशया २६:२”

प्रार्थनेत गुंतलेल्या दोन सैनिकांच्या फोटोखाली असं लिहिलं होते: “मी कोणाला पाठवू? आमच्यासाठी कोण जाईल?” तेव्हा मी म्हणालो, “हा मी आहे! मला पाठव.” यशया ६:८”



सूर्यास्ताच्या वेळी एका अमेरिकन रणगाड्याचा फोटो त्यावर लावण्यात आला आहे, ह्या कारणास्तव तुम्हांला वाईट दिवसांत प्रतिकार करता यावा व सर्वकाही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री घ्या. इफिसकरांस ६:१३"

https://www.wsj.com/articles/SB124266487032730893







जेव्हा एखादा बाहेरचा माणूस अशा गोष्टी पाहतो तेव्हा ख्रिस्ती धर्म हा सत्ताधारी लोकांच्या हातात एक राजकीय हत्यार असल्यासारखा वाटतो. अशा गोष्टी

पाहिल्यावर एखादा मुस्लिम काय विचार करतो याची आपण कल्पनाच करू शकतो, पण हे सांगायला नकोच की त्यामुळे तो ख्रिस्ती लोकांसारखा होत नाही. योहान बाप्तिस्मा करणाऱ्याने सैनिकांना काय करायचे असे विचारले तेव्हा त्याने जे विधान केले होते त्यासोबत ढोंगीपणाची खोली जवळजवळ सहन करण्यासारखी नाही:

शिपायांनीही त्याला विचारले, “आम्ही काय करावे?” त्याने त्यांना सांगितले, “कोणावर जबरदस्ती करू नका व कुभांड आणू नका, तर आपल्या पगारात तृप्त असा.” लूक ३:१४

अमेरिका हे ऐतिहासिकदृष्ट्या पृथ्वीवरील सर्वात ख्रिस्ती देश आहे. जगभरातील ख्रिस्ती समुदाय त्यांच्या मंडळींचे भावी नेते धर्मशास्त्र शिकण्यासाठी अमेरिकेत पाठवतात. जसं सौदी अरेबियाचे धन वापरून जगभरात इस्लामला सौदी अरेबियाच्या प्रतिमेत घडवले जाते म्हणजेच वहाबवाद तसंच अमेरिकेचे संपत्तीवरचे वर्चस्व एका विशिष्ट प्रकारच्या ख्रिस्ती धर्माला टिकवून ठेवते, जो ख्रिस्ती धर्म अमेरिकेला मान्य आहे. हा एक नैसर्गिक प्रवास आहे, कारण धर्म कधीही त्या संस्कृतीपासून वेगळा असू शकत नाही, ज्यामध्ये तो जन्म घेतो. म्हणून अमेरिकेचा ख्रिस्ती धर्म खूपच “अमेरिकन” आहे. आणि जसं अमेरिका हॉलीवूड चित्रपट, कोकाकोला आणि फेसबुक संपूर्ण जगभर पोहोचवते, तसंच तो हा "अमेरिकन" ख्रिस्ती धर्मही जगभर पसरवतो.

अमेरिकेतील ख्रिस्ती लोक सैन्यात दाखल होण्यासाठी, म्हणजेच देवासाठी/देवाचा सैनिक होण्यासाठी, खूपच उत्सुक असतात. यामागचं गृहितक असं आहे की, अमेरिकन सैन्य जे काही करत आहे ते म्हणजे देवाची इच्छा पूर्ण करणे. पण येशू काय म्हणाला होता? “जा आणि राष्ट्रांना शिकवा” का “जा आणि राष्ट्रांचा तख्तापलट करा”? जेव्हा मी अमेरिकेने केलेल्या सर्व राजकीय "हस्तक्षेपांची" यादी मांडतो (ज्याला दुसऱ्या शब्दांत “शासन बदलण्याचे प्रयत्न” म्हणतात), तेव्हा एखादा पुराणमतवादी विचारू शकतो: “पण प्राचीन काळात देव स्वतःच तर राष्ट्रांच्या व्यवहारांमध्ये हस्तक्षेप करत नव्हता काय? त्याने इस्राएल या स्वतःच्या राष्ट्राचा उपयोग इतर राष्ट्रांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी केला नव्हता काय?” माझं उत्तर असं आहे: “देवाचं राज्य आणि माणसांची राज्यं यामध्ये काही फरक आहे की नाही?” ही यादी पाहताना, लक्षात ठेवा की यातील प्रत्येक घटनेमागे स्वतःची एक स्वतंत्र, गुंतागुंतीची कहाणी आहे, आणि ती स्वतः संशोधन करून समजून घेण्यासारखी आहे.

| इतर राष्ट्रांची सरकारं उलथवून टाकणे: मुख्य यादी<br>= यशस्वीपणे सत्ता उलथवून टाकणे | |
|---|---|
| चीन 1940 ते 1960 | अंगोला 1975, 1980 |
| अल्बानिया 1949-1953 | झैरे 1975 |
| पूर्व जर्मनी – 1950चे दशक | ग्रेनेडा 1983 |
| इराण 1953 | दक्षिण येमेन 1982-84 |
| ग्वाटेमाल 1954 | सुरिनाम 1982-84 |
| कोस्टा रिका 1950, 1970-71 | फिजी 1987 |
| सीरिया 1956-57 | लिबिया 1980चे दशक, 2011 |
| मिसर (इजिप्त) 1957 | निकाराग्वा 1981-90 |
| पोर्तुगाल 1974-76 | पनामा 1989 |
| जमैका 1976-80 | बुल्गेरिया 1990 |
| सेशेल्स 1979-81 | अल्बानिया 1991 |
| चाड – 1981-82 | इराक 1963, 1991, 2003 |
| इंडोनेशिया 1957-58, 1965 | अफगाणिस्तान 1980, 2001 |
| ब्रिटिश गयाना 1953-64 | सोमालिया 1993, 2007 |
| उत्तर व्हिएतनाम 1945-1973 | युगोस्लाविया 1999-2000 |
| कंबोडिया 1955-1970 | व्हेनेझुएला 2002 |
| लाओस 1958, 1959, 1960 | हैती 2004 |
| इक्वाडोर 1960-63, 2000 | सीरिया 2012 |
| कोंगो 1960 | युक्रेन 2014 |
| ब्राझील 1962-64 | |
| डोमिनिकन प्रजासत्ताक 1963 | |
| फ्रान्स 1965 | |
| क्युबा 1959 | |
| बोलिव्हिया 1964, 1971 | |
| घाना 1966 | |
| चिली 1964-73 | |
| ग्रीस 1967 | |
| ऑस्ट्रेलिया 1973-75 | |

https://williamblum.org/essays/read/overthrowing-other-peoples-governments-the-master-list

मत्तय २६:५२ तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील.

## राजकारणात धर्म ही काही नवीन गोष्ट नाही.

आजकाल बहुतांश निधर्मी बुद्धिवादी लोक आजपर्यंत घडलेल्या घटनांमागे धार्मिक विचारसरणीचा जो खोल परिणाम आहे, त्याला कमी लेखतात. मंडळी संस्था विशेषतः कॅथलिक मंडळी या सरकारांपेक्षा कितीतरी जुन्या आणि अधिक स्थिर आहेत, आणि म्हणूनच त्या अनेकदा दीर्घकालीन योजना आखू शकतात, तर निवडणुकीतून निवडलेली सरकारे काही वर्षांनी बदलतात. एखाद्या धोरणामागील धार्मिक प्रेरणा ही निधर्मी लोकांना समजत नाही, आणि आज बहुसंख्य लोक हे निधर्मी आहेत. याशिवाय, आधुनिक माणसाला इतिहासात फारसा रस नाही. त्यामुळे धार्मिक प्रेरणांनी घडलेल्या ऐतिहासिक प्रक्रिया त्याला जणू काही अंधश्रद्धा किंवा जादूटोणा वाटतो, आणि त्यामुळे आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. पण त्याचे परिणाम मात्र टिकून राहतात. मी एक उदाहरण देतो, आणि ते म्हणजे १९१७ सालचा बॅल्फर जाहीरनामा. हा दस्तऐवज आधुनिक इस्राएल राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया सुरू करणारा निर्णायक सरकारी दस्तऐवज मानला जातो.

“पॅलेस्टाईनमध्ये यहुदी लोकांसाठी एक राष्ट्रीय घर असावे, ह्या मोहिमेला सरकार अनुकूल आहे, आणि हे साध्य होण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करेल. मात्र हे स्पष्ट समजले पाहिजे की पॅलेस्टाईनमध्ये आधीपासून राहणाऱ्या यहुदी समुदायांचे नागरिक आणि धार्मिक हक्क किंवा इतर देशांतील यहुदी लोकांचे राजकीय दर्जा व हक्क यांना त्यामुळे बाधा येता कामा नये.” - बॅल्फर जाहीरनामा

वरवर पाहता, हे एक सामान्य राजकीय पत्र वाटते, कदाचित ब्रिटिश राजकारणातील यहुदी प्रभावामुळे तयार झालेले. पण त्यामागे आणखी खोल कारणं आहेत. अनेक ख्रिस्ती झायनिस्ट बॅल्फर स्वतः यांना पॅलेस्टाईनमध्ये यहुदी राष्ट्र व्हावे असे वाटत होते, कारण त्यांच्या मते बायबलमधील अंतकालीन भविष्यवाण्या पूर्ण होण्यासाठी ते टप्पे आवश्यक होते. त्यांना असं वाटत होते की, ते येशूच्या पुनरागमनासाठी आणि जगाच्या अंतासाठी भूमी तयार करत

आहेत, ज्यामुळे एक नवा पृथ्वीस्वरूप स्वर्ग निर्माण होईल.

बॅल्फर जाहीरनाम्याच्या बाबतीत इंग्लंडमधील ख्रिस्ती झायनिस्टांचा मोठा प्रभाव होता, हे कोणालाही विशेष वाटायला नको. गोल्डमनच्या म्हणण्यानुसार, ब्रिटनचे परराष्ट्र सचिव लॉर्ड आर्थर जेम्स बॅल्फर यांच्या "धार्मिक श्रद्धा त्यांच्या राजकीय निर्णयांवर प्रभाव टाकत असत, विशेषतः यहुदी लोकांचे पॅलेस्टाईनमध्ये पुनरागमन हे बायबलमधील भविष्यवाणींची पूर्तता आहे," असे त्यांना वाटत असे. बॅल्फर यांनी लॉर्ड लायनल वॉल्टर रॉथसचाईल्ड यांच्याकडे दिलेला जाहीरनामा जे ब्रिटिश झायनिस्ट फेडरेशनचे नाममात्र अध्यक्ष होते हा जितका राजकीय दस्तऐवज होता, तितकाच तो धार्मिकही होता. "पॅलेस्टाईनमध्ये यहुदी लोकांसाठी एक राष्ट्रीय घर स्थापन करणे" ही कल्पना ख्रिस्ती श्रद्धेतील मसीहा आगमनाच्या वास्तवाशी जोडलेली होती. बॅल्फर जाहीरनामा हा केवळ आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचा आणि मोठ्या शक्तींनी यहुदी आकांक्षांना दिलेल्या मान्यतेचा दस्तऐवज नव्हता.
https://www.jpost.com/Opinion/Christian-Zionism-and-the-Balfour-Declaration-508034

आज जगभरात अनेकांना आश्चर्य वाटते की अमेरिका इस्राएलला इतक्या जोमाने पाठिंबा का देते. अनेकांचा समज आहे की अमेरिकन सरकारमध्ये यहुद्यांचा प्रभाव मोठा आहे, म्हणून इस्राएलला समर्थन मिळते. खरंतर, अमेरिकेत यहुद्यांची लोकसंख्या मोठी आहे, हे खरे आहे, पण इस्राएलला जो भक्कम पाठिंबा आहे तो प्रामुख्याने ख्रिश्चन धर्मतत्वावांवर आधारलेले लोकांकडून येतो आणि त्यांच्या धार्मिक शिकवणुकीतील समजुतींवर विशेषतः भविष्यवाणींच्या अर्थावर आधारित असतो. म्हणूनच अमेरिकन सरकार इस्राएलाच्या बाजूने इतकं ठाम आणि कधीही न ढळणारं समर्थन करते, बऱ्याचदा आपल्या स्वतःच्या सुरक्षिततेचंही भान न ठेवता. माझ्या मते, मुस्लिम जगताला हे काही प्रमाणात समजलेले आहे, आणि त्यामुळेच हे आपल्याला हादरवायला लावायला हवे. यामुळे मुस्लिम अरब ख्रिस्ती अरबांकडे खूप संशयाने पाहतात.

जर तुम्ही 'बाल्फोर घोषणापत्र' आणि 'भविष्यवाणी' हे शब्द गुगलवर शोधले, तर तुम्हाला हजारो दुवे मिळतील जिथे लोक या गोष्टीकडे एक भविष्यवाणी पूर्ण झाल्याप्रमाणे पाहतात आणि म्हणतात की आपण सध्या अंतकाळात जगत आहोत. समस्या अशी आहे की या विचारसरणीचा अर्थ असा होतो की सरकारची

धोरणे ठरवू शकतात की देव या जगात कसे व कधी कार्य करतो. ही कल्पना पारंपरिक प्रोटेस्टंट विचारधारेतील मंडळी आणि राज्य यांच्यातील विभाजनाच्या तत्त्वाला खालसा करते. जर सरकार येशूच्या पुनरागमनाला गती देऊ शकत असेल, जर सरकार देवाच्या इच्छेनुसार धोरणे आखू शकत असेल, जर सरकार केवळ मिशनऱ्यांना पैसे पुरवून देवाचा संदेश पसरवू शकत असेल तर मग ख्रिस्ती लोकांना थेट सरकारमध्ये प्रवेश करून किंवा त्याच्याशी संबंध बांधून हे कार्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असं वाटणं स्वाभाविक ठरतं, नाही काय? हे अगदी तंतोतंत माईक पेन्स यांच्या विचारांप्रमाणे आहे. ते डोनाल्ड ट्रम्प यांचे उपराष्ट्रपती होते. त्यांनी २०१७ मध्ये जॉन हेगी यांच्या ख्रिस्ती झायनिस्ट गट 'इस्रायलसाठी एकजूट असलेले ख्रिस्ती' च्या सभेत दिलेल्या भाषणात हे विचार स्पष्ट मांडले. त्यांची ही विचारधारा १९१७ मध्ये बॅल्फर यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या लोकांच्या विचारांचा पुढचा भागच आहे. वॉशिंग्टन पोस्ट मधील हा लेख ही गोष्ट स्पष्ट करतो:

इस्रायलसाठी एकजूट असलेले ख्रिस्ती (CUFI) म्हणजे काय?
२००६ साली जॉन हेगी या सॅन अँटोनीओमधील मोठ्या मंडळीचे पास्टर यांनी याची स्थापना केली. हेगी यांनी मे २०१६ मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. CUFI ही अमेरिकेतील सर्वात मोठी इस्राएलसमर्थक संघटना आहे. ती ३० लाखांहून अधिक सदस्यत्वाचा दावा करते आणि इस्राएलसमर्थक कार्यांसाठी शेकडो कोटी डॉलर्स जमा करत आलेली आहे.

CUFI ही आजच्या घडीलाच ख्रिस्ती झायनिस्ट विचारसरणीचं अमेरिकेतील सर्वात ठळक आणि दृश्यमान रूप मानली जाते.

थांबा, पण ख्रिस्ती झायनिस्ट म्हणजे नक्की काय?
ख्रिस्ती झायनिस्ट विचारसरणी म्हणजे बायबलावर आधारित, इस्राएलला दिलेलं राजकीय व भौतिक समर्थन. आजचे ख्रिस्ती झायनिस्ट मानतात की १९४८ मध्ये इस्राएलाची स्थापना, १९६७ मधील त्याचा लष्करी विजय, आणि पॅलेस्टिनी तसेच आजूबाजूच्या अरब देशांशी सुरू असलेला संघर्ष हे सर्व बायबलामध्ये आधीच भविष्यवाणीच्या रूपात नमूद केलेले आहे आणि हे सर्व देवाने यहुदी लोकांशी केलेल्या कराराशी थेट संबंधित आहे.

इतर काही ख्रिश्चन धर्मतत्वावांवर आधारलेल्या ख्रिस्ती लोकांप्रमाणे जे

आधुनिक इस्राएल राष्ट्राला भविष्यवाणीच्या दृष्टीने फार महत्त्व देत नाहीत, त्यांच्या उलट ख्रिस्ती झायनिस्ट असा युक्तिवाद करतात की इस्राएलला आपण किती प्रखरपणे पाठिंबा देतो, यावर अमेरिका राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे. बहुधा सर्वात जास्त उद्धृत केल्या जाणाऱ्या ख्रिस्ती झायनिस्ट आयतीपैकी एक म्हणजे उत्पत्ती १२:३, जिथे देव अब्राहामाला म्हणतो: "जे तुला आशीर्वाद देतील त्यांना मी आशीर्वाद देईन, आणि जो तुला शाप देईल त्याला मी शाप देईन."

इस्राएलसमर्थक लोकप्रतिनिधी हे अमेरिकेत फारसे दुर्मिळ नाहीत. मग माईक पेन्स यांचे ख्रिस्ती झायनिस्ट विचार वेगळे कसे?

पेन्स यांच्या ख्रिस्ती झायनिस्ट विचारसरणीतील पहिला आणि कदाचित सर्वसामान्य भाग म्हणजे ते मानतात की इस्राएल हे बायबलातील भविष्यवाणीची पूर्तता आहे. मे महिन्यात राज्य कारभाराच्या एका सभेत पेन्स यांनी जाहीरपणे म्हटले की, “१९४८ मध्ये जेव्हा इस्राएल स्थापन झाला, तेव्हा एक भविष्यवाणी अक्षरशः खरी ठरली.” मात्र पेन्स हे मुद्दाम भावी भविष्यवाण्यांच्या पूर्ततेबाबत तर्कवितर्क करण्याचे टाळतात ही गोष्ट ख्रिस्ती झायनिस्टांच्या वर्तुळातही वादग्रस्त मानली जाते, आणि बाहेरील जगात तर नक्कीच. उपराष्ट्रपतीकडून अशी वक्तव्ये झाल्यास प्रशासन इस्राएल-फिलिस्तीन शांतता करारासाठी जे प्रयत्न करत आहे, त्यावर गंभीर शंका निर्माण होऊ शकते.

पेन्स यांच्या विचारांमध्ये एक दुसरी, अधिक सूक्ष्म संकल्पना आहे ती म्हणजे इस्राएल हे देवाच्या “निष्ठेचे लक्षण” आहे. निष्ठेचा हा मुद्दा गेल्या काही दशकांमध्ये अधिक विशिष्ट ख्रिश्चन धर्मतत्वावांवर आधारलेले हेतू घेऊन पुढे आला आहे, कारण पेन्स आणि इतर ख्रिस्ती लोकांना असं वाटते की ते अधिकाधिक निधर्मी होत चाललेल्या सार्वजनिक जीवनात कोपऱ्यात ढकलले जात आहेत. त्यामुळे इस्राएलाचे अस्तित्व हे एक वस्तुनिष्ठ पुरावा ठरते की “देवाने स्वतःच्या लोकांशी केलेलं वचन पूर्ण केले,” पेन्स यांच्या शब्दांत. देवाची निष्ठा ही ख्रिस्ती झायनिस्टांच्या श्रद्धेमध्ये एक विशिष्ट भूमिका बजावते इस्राएलाच्या स्वातंत्र्यप्राप्तीने हे सिद्ध केले की देव मानवी व्यवहारांमध्ये हस्तक्षेप करतो. त्यामुळे इस्राएलाचे भवितव्य हे त्यांच्यासाठी एक मूलगामी धर्मसिद्धांत आहे: फक्त इस्राएल समृद्ध झाल्यावरच देव स्वतःच्या शब्दाला खरे ठरवतो.

https://www.washingtonpost.com/news/made-by-history/wp/2017/07/17/what-you-need-to-know-about-mike-pences-speech-to-christians-united-for-israel/?utm_term=.d6226e5aca76

तुम्हाला आता समजायला लागलं आहे का की आपण देवाची इच्छा कशी समजतो हे का इतकं महत्त्वाचं आहे? जर तुम्ही ख्रिस्ती असाल, तर या विचित्र वाटणाऱ्या विरोधाभासांवर मनन करणं आवश्यक आहे. Fatheroflove.info या ठिकाणी या प्रश्नांनी आम्हाला फार खोलवर अस्वस्थ केले आहे, आणि आम्ही अनेक वर्षं हे समजून घेण्यासाठी प्रयत्नशील आहोत की देवाला आपण त्याला कसा समजावं, आणि आपल्या जीवनासाठी त्याची इच्छा काय आहे, हे आपण कसं समजून घ्यावे? आणि अशा प्रकारच्या ख्रिस्ती विचारसरणीकडे आपण कशा प्रकारे पाहावं? आणि जर तुम्ही ख्रिस्ती नसाल, आणि ही सगळी गोष्ट तुम्हाला अतिशय विचित्र किंवा अडचणीची वाटत असेल, तरीही आम्ही आग्रह करतो की तुम्ही याचा विचार जरूर करा कारण तुमच्या आजूबाजूचे जग अशा शक्तींनी घडवले जात आहे ज्या धार्मिक विचारसरणीवर आधारित आहेत. आणि जर तुम्हाला ही विचारसरणीच समजली नाही, तर तुम्ही अंधारात हातपाय मारत, फक्त अंदाज लावत राहाल. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवायचा असेल, तर धर्मशास्त्र आणि धार्मिक इतिहास यांचं ज्ञान आवश्यक आहे जरी तुम्ही स्वतः धार्मिक नसलात, तरीही.

कारण फारसं काही बदललेलं नाही आहे फक्त एवढंच की आजच्या काळात लोकांचे इतिहासाच्या दृष्टिकोनातून विचार करणे कमी झाले आहे. पण आजही लोक त्यांच्या नेत्यांमध्ये भविष्यवाणींचे प्रतिरूप पाहतात. हीच विचारधारा अनेक ख्रिस्ती लोक आज अध्यक्ष ट्रम्प यांना पाठिंबा देताना वापरतात; ते ट्रम्पची तुलना पर्शियाच्या राजा सिरस याच्याशी करतात जो एक अविश्वासी होता, पण ज्याला यशया ४४ व ४५ मध्ये देवाने स्वतःचा सेवक आणि अभिषिक्त म्हणून संबोधले आहे. अनेक ख्रिस्ती हे मान्य करतात की ट्रम्प हा फारसा भक्त ख्रिस्ती नाही. त्याच्या नैतिक वर्तनाविषयीही त्यांना कल्पना आहे की तो नैतिकदृष्ट्या भ्रष्ट आहे. तरीही, ते असं मानतात की देव त्याचा वापर करत आहे, अगदी जसं देवाने सिरसचा वापर केला होता.

जेव्हा डोनाल्ड ट्रम्प २०१६ च्या सुरुवातीला रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी एक गंभीर दावेदार ठरला, तेव्हा काही ख्रिस्ती लोकांनी

त्याच्याकडे मोक्ष देणाऱ्या साधनाप्रमाणे पाहायला सुरुवात केली. ही कल्पना मुख्यतः त्या धार्मिक सीमारेषेवरील गटांकडून आली ज्यांच्याशी ट्रम्पने जवळीक साधली होती दूरदर्शन धर्मोपदेशक, पेन्टेकोस्टल्स आणि "आरोग्य आणि संपत्ती" ची आश्वासने देणारे धार्मिक व्यापारी. ही कल्पना अशा व्यक्तींकडून आली जसे की लान्स वॉलनाउ, एक इव्हँजेलिकल सार्वजनिक वक्ता, ज्याने ट्रम्पच्या प्रचार मोहिमेदरम्यान त्याची भेट घेतली होती. २०१५ पासूनच वॉलनाउ अशा प्रकारचे लेख लिहीत होता जे ट्रम्पची तुलना सिरस या पर्शियन सम्राटाशी करत होते. वॉलनाउचा युक्तिवाद होता की इतिहासभर देवाने मूर्तिपूजक नेत्यांचाही उपयोग आपल्या इच्छेच्या पूर्ततेसाठी आणि आपल्या लोकांच्या संरक्षणासाठी केला आहे. जसा सिरस  हा याहवेने अभिषिक्त केलेला एक सामर्थ्यशाली राजा होता, ज्याने निर्वासित यहुदी लोकांना बाबेलमधून परत येरुशलेममध्ये येऊन त्यांचे मंदिर पुन्हा उभारण्याची मुभा दिली, तसाच ट्रम्पही "राजकीय शुद्धतेच्या आत्म्याविरुद्ध एक भयंकर गदा आहे," असं वॉलनाउचं म्हणणं होतं. वॉलनाउने आपली ही संकल्पना अखेर देवाचा अराजकता उमेदवार (२०१६) या शीर्षकाखाली एका पुस्तकात प्रकाशित केली. निवडणुकीच्या अगोदरच हे पुस्तक अमेझॉन च्या सर्वाधिक विकल्या गेलेल्या पुस्तकांच्या यादीत एकोणविसाव्या स्थानावर पोहोचले, आणि इतर अनेकांनीसुद्धा ही तुलना चालू ठेवली. मार्च २०१८ मध्ये, इस्रायलाचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अमेरिका भेटीदरम्यान ट्रम्पची ओव्हल ऑफिसमध्ये भेट घेतली आणि इव्हँजेलिकल समर्थकांच्या गजरात सामील झाले. नेतान्याहू म्हणाले, "यहुदी लोकांची स्मरणशक्ती खूप दीर्घकालीन असते. त्यांना सिरस आठवतो. '२५०० वर्षांपूर्वी त्याने जाहीर केले होते की बाबेलमध्ये असलेले यहुदी निर्वासित परत येऊ शकतात आणि येरुशलेममध्ये त्यांचं मंदिर पुन्हा उभारू शकतात.'"
https://harpers.org/archive/2018/05/exiled/

पण इथे पुन्हा एकदा विरोधाभास उभा राहतो. मानवी सरकारे बलावर चालतात. आधुनिक इस्राएलदेखील बल वापरूनच निर्माण झाले. पण येशूने कधी बळाचा वापर केला काय? ख्रिस्त आपल्याला जगाला त्याच्या पित्याशी बळाच्या माध्यमातून जोडायला सांगतो काय? असा काही मार्ग त्याच्या नावाशी, त्याच्या स्वभावाशी सुसंगत आहे काय? आणि यावरून एक अजून खोलवर प्रश्न उपस्थित होतो म्हणजे देवाचं राज्य मानवी राज्यांसारखंच आहे काय? ते बळावर चालतं काय? त्याचे नियम फक्त त्याने तसे सांगितले म्हणून आहेत का मानवी कायद्यांप्रमाणे, जे कधीही मनमानीने बदलता येऊ शकतात? की देवाचे नियम हे सृष्टीच्या आराखड्यानुसार, तिच्या स्थैर्यासाठी, आणि आपल्या कल्याणासाठी

आखलेले आहेत?

या लेखात वर उद्धृत केलेली Harper’s मधील लेखिका मेघन ओ’गिब्लिन हिने 2000 च्या दशकाच्या सुरुवातीला प्रसिद्ध मूडी बायबल इन्स्टिट्यूट मध्ये धर्मशास्त्राचा अभ्यास केला होता, पण नंतर तिने तिचा विश्वास सोडला. ती आपला लेख एका हळव्या आणि दुःखद मनःस्थितीत संपवते, जिथे ती देवाच्या स्वभावाविषयी असलेल्या तिच्या साशंकतेचं चित्र रंगवते:

“उपाध्यक्ष जुन्या करारातील उद्धाराच्या वचनांचा आवर्जून उल्लेख करतो, पण हे ग्रंथ एका क्रूर नैतिक गणितावर आधारलेले आहेत, जे ख्रिस्ताच्या शिकवणीशी जुळवणं कठीण जाते. इस्राएलला नेहमी त्याच्या कृतीनुसार फळ मिळते शिक्षा किंवा उद्धार पण त्या चक्रात अनेकजण फटकारले जातात. इस्राएलाचे शत्रू निर्दयपणे ठार मारले जातात. आणि त्या असंख्य परकीय जमाती ज्या देवाने याहूदासाठी ठरवलेल्या भूमीवर राहात होत्या, किंवा ज्या त्यांच्या धार्मिक शुद्धतेला धोका ठरू शकत होत्या त्यांचा अंत होतो. त्यांच्या विनाशाचा उल्लेख त्या कथा-कथनात केवळ एका वाक्यात केला जातो: ‘मिद्यान लोक जिथे राहत होते ती सगळी गावे त्यांनी जाळून टाकली, आणि त्यांची सर्व छावणीदेखील.’ मला आठवते, जेव्हा मी बायबल स्कूलमध्ये होते, तेव्हा मी अशा वचनांवर येत होते माझ्या मनात पहिल्यांदा शंका उगम पावत होत्या मी समजून घेण्याचा प्रयत्न करत होते की इतक्या लोकांना एका निवडलेल्या समूहाच्या उद्धारासाठी एवढं भोगावे का लागते? का या निवडलेल्या लोकांशी देवाच्या चाललेल्या या अखंड नाटकात इतका भयंकर मोबदला द्यावा लागतो?"

आपण जसं पाहतो, तसंच आपण बनतो. आपण सतत ज्या गोष्टींचा विचार करतो, त्या आपल्या मनावर परिणाम करतात. अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्या देवाची प्रतिमा आजच्या जगावर एक गडद सावलीसारखी पसरलेली आहे. हा देव नेमका कोण आहे? येशूने जे म्हटले, "ज्याने मला पाहिले, त्याने पित्यालाही पाहिले आहे," हे खरंच आहे काय? पित्याचा खरोखर येशूप्रमाणेच स्वभाव आहे काय? पण मग जुन्या करारात नेमकं काय घडलं? ‘अगापे’ हे पुस्तक आम्ही वाचण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकाला अगदी मोफत देण्यास तयार आहोत. कृपया आमच्याशी संपर्क साधा.

# मिशनरी आणि साम्राज्य

परदेशात कार्यरत असलेल्या बहुसंख्य मिशनऱ्यांचा उगम अमेरिकेतून झाला आहे. 2007 साली मी जॉर्डनमध्ये अरबी भाषा आणि इस्लाम यांचा अभ्यास करत होतो. जॉर्डन हे एक मध्य पूर्वेतील राष्ट्र आहे जे इराक आणि इस्राएलच्या मध्ये आहे. मध्य पूर्वेतील राजकारणात CIA चा सतत हस्तक्षेप झाल्यामुळे, मी आणि युनिव्हर्सिटी ऑफ जॉर्डनमध्ये एक सेमेस्टरसाठी शिकणारे इतर अमेरिकन विद्यार्थी, यांना अनेकदा प्रश्न विचारले जात असत किंवा आम्हाला CIA एजंट असल्याचा आरोप झेलावा लागत असे. अनेक मिशनऱ्यांकडेही संशयाच्या नजरेने पाहिले जाते. अनेक राष्ट्रांना असे वाटते की मिशनरी हे पाश्चात्य नियंत्रणाच्या आघाडीचे शिलेदार असतात. उदाहरणार्थ, भारत आजही मिशनऱ्यांना देशात येऊ देत नाही, कारण ते देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा आणणारे मानले जातात. याच विषयावर एक उत्कृष्ट लेख आहे "The Religious Crusades" जो एका भारतीय नागरिकाने लिहिला आहे, ज्याला आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाविषयी चिंता वाटते. त्यातील एक उतारा खाली दिला आहे:

CIA आणि चर्च यांच्यातील संबंध ही एक अशी बाब होती जी अमेरिकन सिनेटने १९७५ मध्ये केलेल्या तपासणीत उचलून धरली होती. योगायोगाने, या समितीचे नेतृत्व सिनेटर फ्रँक चर्च यांनी केले होते, म्हणूनच या समितीला "Church Committee" असे नाव मिळाले. या समितीच्या अहवालानुसार, CIA ने त्यांना निदान "१४ गुप्त व्यवहारांची" माहिती दिली होती, ज्यामध्ये थेट कार्यरत स्वरूपात "२१ व्यक्तींचा" जे अमेरिकी धर्मगुरू किंवा मिशनरी होते ह्यांचा वापर करण्यात आला होता. अहवाल पुढे सांगतो की यांपैकी काहीजण "ऑगस्ट १९७५ मध्येही कार्यरत होते आणि CIA च्या म्हणण्यानुसार, त्यांचा वापर केवळ गुप्त माहिती संकलनासाठी किंवा एका प्रकरणात दुसऱ्या व्यक्तीच्या छुप्या ओळखीचं संरक्षण करण्याच्या किरकोळ भूमिकेसाठी करण्यात आला होता."

मंडळींच्या सभासदच्या अहवालातील पुढील उतारा स्वतःच बोलका आहे आणि भारतात परकीय मिशनऱ्यांना परवानगी देणं किती धोकादायक ठरू शकतं हे स्पष्टपणे दाखवतो.

"CIA ने धार्मिक व्यक्तींना पगार, बोनस किंवा खर्च दिले, किंवा त्यांच्या संचालित प्रकल्पांना निधी पुरवला. या व्यक्तींपैकी बहुतांशांचा वापर गुप्त कारवायांसाठी करण्यात आला. काही जण १९६० च्या दशकाच्या मध्यात राबवण्यात आलेल्या मोठ्या गुप्त कारवायांमध्ये सहभागी होते, ज्यांचा उद्देश तृतीय जगतात कम्युनिझमशी 'स्पर्धा' करणे हा होता...

अलीकडील संबंधांपैकी सर्वात नुकसानकारक संबंध असा दिसतो की एका अमेरिकन पाद्रीचा CIA ने माहिती पुरवणाऱ्या म्हणून वापर केला होता, जो विद्यार्थीवर्गातील आणि धार्मिक क्षेत्रातील असंतोषावर माहिती पुरवत होता.

जुन्या प्रकरणांपैकी एक उदाहरण हे दाखवते की CIA ने गोपनीय आत्मिक नातेसंबंधांचा किती प्रमाणात वापर केला. CIA ने तृतीय जगातल्या एका देशातील मंडळीच्या धर्मगुरूचा 'मुख्य एजंट' म्हणून वापर केला, जो गुप्त कारवायांच्या प्रकल्पांमध्ये सहभागी होता, तसेच निरीक्षक, मूल्यमापन करणारा, एजंट शोधून विकसित करणारा आणि भरती करणारा म्हणून काम करत होता. त्याने राजकीय घडामोडींवरील माहिती आणि व्यक्तींविषयीची माहिती गोळा केली. त्याने CIA च्या प्रचार साहित्याचा प्रसार स्थानिक प्रसारमाध्यमांमध्ये केला.

CIA च्या वर्णनानुसार, त्या पाद्रीचे विश्लेषण हे त्या व्यक्तींशी असलेल्या दीर्घकालीन मैत्रीवर आधारित होते, आणि त्याच्याखालील एजंट्स हे त्याच्या व्यावसायिक आयुष्यातून त्याला चांगले परिचित होते. सुरुवातीला CIA ने त्याच्या सेवा देण्याच्या बदल्यात फक्त अधूनमधून भेटवस्तू दिल्या; नंतर, तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ त्याला CIA ने डॉलर्स ११,४१४ एवढं वार्षिक वेतन दिले."

या उताऱ्यात नमूद केलेली डॉलर्स ११,४१४ ही रक्कम आपल्याला हा संकेत देते की संबंधित देश भारत असावा, कारण त्या वेळच्या चलन विनिमय दरानुसार ही रक्कम एकदम अचूक एक लाख रुपये होते. ही रक्कम केवळ एक अचूक गोल आकडा नव्हता, तर १९७० च्या दशकात भारतात ती खूप मोठी आणि लक्षणीय रक्कम मानली जात होती.

CIA स्थापन झाल्यानंतर, ख्रिस्ती मिशनऱ्यांनी विविध देशांत अस्थिरता निर्माण

करण्यात आणि CIA साठी गुप्तहेर कार्य पार पाडण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. (http://indiafacts.org/religious-crusades-cia/)
ख्रिस्ती लोकांविषयी इतका अविश्वास आहे, यात खरंच काही आश्चर्य आहे काय? प्रत्येक मिशनऱ्याने पण विशेषतः अमेरिकन आणि (इथे NATO सहयोगी देशाचे नाव टाका) मिशनऱ्यांनी ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे, विशेषतः जेव्हा त्यांना वाटते की सुवार्ता प्रचार करणे इतके अवघड का आहे. अमेरिकन डॉलर्सना तृतीय जगातील देशांमध्ये खूप मोठे मूल्य आहे, आणि CIA चा बजेट तर जवळपास अमर्यादित वाटावा असा आहे.

1977 मध्ये असा एक कायदा मंजूर झाला होता, ज्यामध्ये CIA ला पत्रकार आणि मिशनऱ्यांचा वापर करण्यास मनाई करण्यात आली होती. पण 1996 मध्ये असं उघड झालं की, जर "राष्ट्रीय सुरक्षेला एक अद्वितीय आणि विशेष धोका" असेल, किंवा जर मिशनऱ्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यासाठी सहमती देतील, तर या कायद्याला सहजपणे मोडता येते.
(https://wapo.st/2wVm3P2)

अलीकडे अशी बातमी समोर आली की एका ख्रिस्ती स्वयंसेवी संस्थेचा वापर उत्तर कोरियामध्ये गुप्तहेरगिरी करण्यासाठी मुखवटा म्हणून करण्यात आला, तसेच व्हेनेझुएलामधून एक गट हाकलून देण्यात आला.

"इथे, संयुक्त राष्ट्रांमध्ये असलेले मिशनरी सीआयएच्या खूपच जवळ गेले आहेत," असं टोनी कॅंपोलो म्हणाले ईस्टर्न युनिव्हर्सिटी येथील समाजशास्त्राचे एमेरिटस प्राध्यापक आणि शिक्षणाच्या प्रचारासाठी इव्हँजेलिकल असोसिएशन चे संस्थापक आणि अध्यक्ष एका अलीकडील पॉडकास्टमध्ये. "उदाहरणार्थ," कॅंपोलो यांनी RedLetterChristians.org वर प्रसिद्ध झालेल्या ऑडिओमध्ये सांगितले,

"बऱ्याचदा जेव्हा मिशनरी परदेशातून परत येतात विशेषतः जर त्यांनी पाकिस्तान किंवा अफगाणिस्तानसारख्या देशांमध्ये सेवा दिली असेल तेव्हा CIA त्यांना वॉशिंग्टनला बोलावते." "आणि खूप वेळा असे होते की हे मिशनरी वॉशिंग्टनला जातात आणि त्यांचे ‘विचारणीची बैठक" घेतले जाते: तुम्ही ज्या गावांमध्ये कार्यरत होतात, तिथले स्थानिक नेते कोण होते? मंडळीमधील लोकांचा अमेरिकेबद्दल दृष्टिकोन काय होता?”
https://baptistnews.com/article/campolo-says-us-missionaries-too

-close-to-cia/#.W44Ess4zZJw

असं वाटतं की अनेकदा मिशनऱ्यांवरच हे अवलंबून राहते की त्यांनी CIA सोबत काम करायचं की नाही. यात काही शंका नाही की CIA कडे त्यांचं सहकार्य मिळवण्यासाठी गोडीगुलाबी आमिषं आणि दबावाचे उपाय हे दोन्ही असतात. पण इथे एक प्रश्न उपस्थित होतो: मिशनऱ्यांना इतक्या वेळा असं का वाटते की हे करणं ठीक आहे? अमेरिका हे मंडळी आणि राज्य यांच्यातील विभाजनावर आधारित म्हणून स्थापन झाली होती. पण जर सरकारच्या फायद्यासाठी मंडळीचा वापर केला जात असेल, आणि मंडळीच्या फायद्यासाठी सरकारचा, तर मग नक्कीच अशी एक धार्मिक विचारप्रणाली प्रस्थापित केली जाऊ शकते जी दोन्ही बाजूंना अनुकूल ठरेल. खरं तर, ख्रिस्ती धर्माच्या इतिहासात असं काही घडणं नवीन नाही. अमेरिका जिला प्राचीन रोमची सर्व प्रतीकं आपलीशी वाटतात ती केवळ प्रतीकात्मकतेतच नव्हे तर धार्मिक आणि राजकीय प्रवासाच्या मार्गावरही रोमन प्रजासत्ताक आणि साम्राज्याच्या पावलावर पाऊल ठेवत आहे, असं स्पष्ट दिसते.

एकदा होऊन गेले तेच होणार; करण्यात आले तेच करण्यात येणार; भूतलावर नवे म्हणून काहीच नाही; उपदेशक १:९

## कॉन्स्टँटाईन आणि ट्रम्प

तुम्हाला रोमन सम्राट कॉन्स्टंटाईन विषयी काय वाटतं ज्याने इ.स. ३१३ मध्ये ख्रिस्ती धर्मियांचा छळ संपवला, ख्रिस्ती धर्माला राज्यधर्माचा दर्जा दिला, आणि स्वतः पहिला ख्रिस्ती सम्राट बनला? हे चांगलं घडलं की वाईट? तुम्ही हे कसं समजता, यावर तुमचं इतिहासाचं, कायद्याचं आणि सुवार्तेची समज कशा प्रकारची आहे हे खूप काही उघड करणारं ठरते. जर कोणी गुगलवर 'कॉन्स्टंटाईन' आणि 'ट्रम्प' हे दोन शब्द शोधले, तर असे दोन लेख सापडतात जे या दोघांमध्ये साम्य मानतात पण त्यांपैकी एक लेख म्हणतो की हे साम्य चांगले आहे, आणि दुसरा म्हणतो की हे वाईट आहे.

खाली आहे तो माणूस जो म्हणतो की हे चांगलं आहे:

